नवराष्ट्र
Pune | 12 June 2026 | Page 4

## विद्या प्रतिष्ठान -क्विक हीलमध्ये करार!

# विद्यार्थी बनणार 'डिजिटल सुरक्षा दूत'



**▶ बारामती, प्रतिनिधी.** वाढत्या डिजिटल व्यवहारांमुळे आणि इंटरनेटच्या वापरामुळे सायबर गुन्ह्यांचे प्रमाण झपाट्याने वाढत असताना सायबर सुरक्षेविषयी व्यापक जनजागृती करणे ही काळाची गरज बनली आहे. याच गंभीर पार्श्वभूमीवर बारामती येथील नामांकित विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय आणि 'क्विक हील फाउंडेशन' यांच्यात सायबर सुरक्षा व डिजिटल साक्षरता प्रसारासाठी एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार (MoU) करण्यात आला आहे.

आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन आर्थिक फसवणूक, ओटीपी (OTP) घोटाळे, सोशल मीडियाचा गैरवापर, डेटा चोरी आणि बनावट लिंक्सद्वारे होणाऱ्या फसवणुकीच्या घटनांमध्ये सातत्याने चिंताजनक वाढ होत आहे. अशा परिस्थितीत तरुण विद्यार्थ्यांनी स्वतः सायबर सुरक्षेबाबत सजग राहून समाजातील इतर घटकांनाही जागरूक करणे अत्यंत आवश्यक आहे.

## विविध उपक्रमांचे होणार आयोजन

या संयुक्त उपक्रमांतर्गत आगामी काळात महाविद्यालयात आणि परिसरात विशेष प्रशिक्षण कार्यशाळा, सायबर तज्ज्ञांची व्याख्याने, जनजागृती शिबिरे, माहितीपूर्ण स्पर्धा, पथनाट्ये तसेच सायबर सुरक्षा अभियानांचे मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात येणार आहे. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा सुरक्षित, जबाबदार आणि प्रभावी वापर करता यावा, तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक असणारी कौशल्ये त्यांच्यात विकसित व्हावीत, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू आहे.

## मान्यवरांची उपस्थिती

या सामंजस्य करार सोहळ्याप्रसंगी क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर, सहयोगी संचालक अजय शिर्के, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ. शामराव घाडगे, संगणक शास्त्र विभागप्रमुख प्रा. महेश पवार तसेच कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. अक्षय भोसले उपस्थित होते. याप्रसंगी प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.